भा "ड" कोर्ट

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** वडुज

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0223 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**25/05/2023 20:31

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 25/05/2023

**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 25/05/2023

**Time From (वेळेपासून):** 11:15 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:18 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 25/05/2023 **Time (वेळ):** 19:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 037

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/05/2023 20:14 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती कार्यालय, खटाव वडूज,खटाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** वडुज

**District(State) (जिल्हा(राज्य)):** सातारा(महाराष्ट्र)

**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री.दिलावर गुलाब मुलाणी

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1978

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राईविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नवीन वसाहत, माळीनगर रोड, मायणी,खटाव,वडुज ,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नवीन वसाहत, माळीनगर रोड, मायणी,खटाव,वडुज ,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संजय विलासराव सोनावले | | | 1. समर्थ सदन केसरकर पेठ , सातारा,सातारा,सातारा शहर, सातारा,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 12000/रू रोख रक्कम त्यामध्ये 500रू दराच्या एकूण24चलनी नोटा. | 12,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

12,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब दिनांक 25/05/2023
मी, श्री.दिलावर गुलाब मुलाणी, वय 45 वर्षे, व्यवसाय-ग्रामसेवक, ग्रामपंचायत मुसांडवाडी व मायणी रा.नवीन वसाहत, माळीनगर रोड, मायणी, ता.खटाव जि.सातारा मो.नं. 7840991139
मी दि. 24/05/2023 रोजी पोउपअधी वैद्य मॅडम,अँन्टी करप्शन ब्युरो सातारा यांना फोन करुन माझ्याकडे करण्यात येणाऱ्या लाचेच्या मागणी बाबत तक्रार थोडक्यात सांगितली व त्यानुसार मी माझेकडे लाच मागणाऱ्या लोकसेवकांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली. तसेच मला पंचायत समिती, खटाव नोकरीसाठी जावे लागत असल्याने ऑफिस सोडून अँन्टी करप्शन ब्युरोच्या कार्यालयात येण्यास जमणार नाही तर तुम्हीच वडूज येथे येवून माझ्या तक्रारी नुसार कारवाई करावी अशी विनंती मी वैद्य मॅडम यांना केली.
त्यानुसार दि.25/05/2023 रोजी सकाळी 10.45 चे सुमारास मी वैद्य मॅडम यांचे सांगणे नुसार वडूज येथील स्वंयवर मंगल कार्यालयाचे बाजूस असलेल्या मोकळया जागेत थांबलो असताना वैद्य मॅडम व त्यांचे पथक त्या ठिकाणी आले. तेव्हा वैद्य मॅडम यांचे सांगणे नुसार मी गाडी मध्ये बसलो व वैद्य मॅडम यांनी गाडीतील पंचांची माझेशी व माझी पंचांशी ओळख करुन देवून पंचांना माझी तक्रार थोडक्यात सांगितली की, मी मुसांडवाडी व मायणी ग्रामपंचायत येथे ग्रामसेवक म्हणून कार्यरत असून संजय विलासराव सोनावले, विस्तार अधिकारी, पंचायत समिती, खटाव(वडूज) यांनी मला कार्यालयीन कामकाजामध्ये शुल्लक चुका काढून माझा मानसिक छळ करीत असत तसेच वरीष्ठांना कसूरी अहवाल पाठवेन, निलंबित करेन अशा धमक्या देत असत. मायणी ग्रामपंचायत निवडणूकीचे अनुषंगाने झाले प्रकाराबाबत मला गटविकास अधिकारी श्री.साळुंखे साहेब यांनी कारणे दाखवा नोटीस काढलेली आहे त्या कारणे दाखवा नोटीसीच्या अनुषंगाने माझ्यावर कोणतीही कारवाई न करण्यासाठी विस्तार अधिकारी, संजय सोनावले यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केली असून त्याबाबत लेखी तक्रार अर्ज मी वैद्य मॅडम यांना दिला. माझा तक्रारी अर्ज वैद्य मॅडम व पंचांनी वाचुन बघितला व त्यावर सहया घेतल्या. त्यानंतर पोउपअधी वैद्य मॅडम यांनी मला व पंचांना पडताळणी पंचनाम्याची कार्यवाही समजावुन सांगुन त्याबाबत आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोउपअधी वैद्य मॅडम यांचे सुचनेवरुन पो.कॉ.भोसले यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व सीलबंद मेमरी कार्ड मला व दोन्ही पंचांना दाखवून त्याबाबत संपूर्ण माहिती देवून त्यांचेकडील सीलबंद मेमरी कार्ड काढून व्हॉईस रेकॉर्डर मध्ये घातले. त्यानंतर पोउपअधी वैद्य मॅडम यांनी मला व पंच नं.1 यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देवून व्हॉईस रेकॉर्डरसह मला व पंच नं.1 यांना विस्तार अधिकारी, संजय सोनावले यांची भेट घेण्यासाठी पाठविले ती वेळ 11.15 वाजताची होती. सदर वेळी सापळा पथकातील इतर सापळा पथक हे स्वंयवर मंगल कार्यालयाचे बाजूस असलेल्या मोकळ्या जागेत शासकीय वाहनात थांबून होते. मी पंचायत समिती खटाव (वडूज) येथे गेलो तेव्हा माझी भेट संजय सोनावले, विस्तार अधिकारी यांची भेट झाली. तेव्हा संजय सोनावले, विस्तार अधिकारी यांनी कारणे दाखवा नोटीसीच्या अनुषंगाने माझ्यावर कारवाई न करण्यासाठी माझ्याकडे 12,000/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम लगेच स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर मी व पंच नं.1 असे माझ्या दुचाकी वाहनाने सापळा पथक थांबले ठिकाणी परत 11.37 वा.सुमारास आलो. त्यावेळी पोउपअधी वैद्य मॅडम यांचे सुचनेवरुन पो.कॉ.भोसले यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केला. पोउपअधी वैद्य मॅडम यांनी मला व पंच नं.1 यांना झालेली हकीकत विचारुन तसेच रेकॉर्डर मधील संभाषण ऐकून विस्तार अधिकारी, संजय सोनावले यांनी माझ्याकडे 12,000/- रु. लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम लागलीच स्विकारणार असल्याचे पोउपअधी वैद्य मॅडम व दोन्ही पंचांची खात्री झाली.
लोकसेवक सोनावले साहेब यांनी मला लागलीच लाचेची रक्कम आणुन देण्यास सांगितलेने वेळेच्या अभावी व जागेच्या अभावी पडताळणी दरम्यान माझ्यामध्ये व सोनावले साहेबांच्यामध्ये झालेल्या संभाषणाची स्क्रिप्ट नंतर करण्यात येईल असे वैद्य मॅडम यांनी सांगितलेने लागलीच सापळा पुर्व व सापळा कारवाईचे आयोजन करण्यात आले. सापळा पुर्व कारवाईच्या अनुषंगाने वैद्य मॅडम यांनी मला व पंचांना आवश्यक त्या सुचना देवुन सदरची सापळा

कारवाई शासकीय वाहनातच पुर्ण करण्यात येणार असल्याबाबत सांगितले. त्यानंतर सोनावले साहेब हे माझ्याकडुन लाच स्विकारणार असल्याची खात्री झाल्यावर पोउपअधी वैद्य मॅडम यांनी सापळा कारवाईचे आयोजन करुन मला 12,000/- रु.लाच रक्कम हजर करण्यास सांगितल्याने मी 12,000/- रु इतकी लाचेची रक्कम पोउपअधी वैद्य मॅडम यांचेकडे हजर केली.वैद्य मॅडम यांचे सुचनेनुसार पो.ना.चव्हाण यांनी अँन्थ्रासीन पावडर व अल्ट्रा व्हॉयलेट दिवा यांची मला व पंचांना माहिती देवून त्याचे प्रात्याक्षिक शासकीय वाहनामध्ये कृत्रिम अंधार करुन दाखविले. त्यानंतर पो.ना.चव्हाण यांनी वैद्य मॅडम यांचे सुचनेनुसार 12,000/- रु. लाचेच्या रक्कमेस अँन्थ्रासीन पावडर लावली व ती लाचेची रक्कम माझ्या शर्टच्या डावे बाजूच्या खिशात ठेवून दिली व मला व पंच नं.1 यांना लाचेची रक्कम घेवून विस्तार अधिकारी, संजय सोनावले यांना देण्यासाठी 12.04 वा. रवाना केले.

त्यानंतर मी व पंच नं.1 असे माझ्या दुचाकीवरुन पंचायत समिती, खटाव (वडूज) येथे गेलो. मी व पंच नं.1 असे पंचायत समिती कार्यालयाचे पाठीमागून पंचायत समिती मधील संजय सोनावले, विस्तार अधिकारी यांचे केबीनमध्ये गेलो. त्यावेळी मी आत जावून सोनावले साहेबांची भेट घेतली तेव्हा लोकसेवक सोनावले यांनी माझ्यासोबत इतर बोलणी करुन मी लोकसेवक यांना बर देवू का? असे विचारल्या नंतर लोकसेवक सोनावले यांनी मला किती आणले असे विचारले. त्यावर मी सोनावले साहेबांना 12,000/- रु. आणले आहेत असे म्हणून मी माझ्या शर्टच्या डावे बाजूच्या खिशातून उजव्या हाताने लाचेची रक्कम काढून सोनावले साहेब यांचे समोर धरुन मोजून घ्या असे म्हणालो. तेव्हा सोनावले साहेबांनी लाच रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्विकारुन लाच रकमेच्या नोटा दोन्ही हाताने मोजून त्यांचे पॅन्टच्या पुढील उजवे बाजूच्या खिशात ठेवल्या. त्यानंतर विस्तार अधिकारी, संजय सोनावले यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर मी त्यांचे केबीनच्या बाहेर येवून माझा डावा हात दोन वेळा डोक्यावर फिरवून सापळा पथकाला दिसेल अशा रितीने पूर्वनियोजित इशारा केला.

सदर इशारा पाहून पोउपअधी वैद्य मॅडम यांचे सुचनेनुसार पो.कॉ.भोसले यांनी माझ्या जवळ येवून माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केला ती वेळ 12.18 वा.ची होती त्यानंतर सापळा पथकाने विस्तार अधिकारी, संजय सोनावले यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पोउपअधी वैद्य मॅडम यांनी पंचायत समिती खटाव (वडूज) येथील गटविकास अधिकारी, उदयसिंह साळुंखे यांना सापळा कारवाईची माहिती दिली. त्यानंतर सापळा पथक पंचनाम्याचे पुढील कारवाई करण्याकरीता शासकीय विश्रामगृह, वडूज येथे आले व याच ठिकाणी सापळा पंचनाम्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.

तरी दि.25/05/2023 रोजी 11.15 ते 12.18 वा.चे दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कारवाईमध्ये लोकसेवक संजय विलासराव सोनावले, वय-56 वर्षे, विस्तार अधिकारी, पंचायत समिती, खटाव (वडूज) रा.समर्थ सदन, केसरकर पेठ, सातारा, मुळ रा.खंडोबाची पाली, बस स्टॅण्ड जवळ, पाली ता.कराड जि. सातारा यांनी मला मायणी ग्रामपंचायत निवडणुकी मध्ये झाले प्रकाराबाबत गटविकास अधिकारी साळुंखे यांनी काढलेल्या कारणे दाखवा नोटीसीच्या अनुषंगाने माझ्यावर कोणतीही कारवाई न करण्यासाठी विस्तार अधिकारी, संजय विलासराव सोनावले यांनी माझ्याकडे 12,000/- रु.लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम पंचायत समिती, खटाव (वडूज) कार्यालयातील विस्तार अधिकारी यांचे केबिनमध्ये स्विकारली म्हणून माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

समक्ष हा खबरी जबाब दिला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
उज्वला अरुण वैद्य DYSP. ACB. सातारा.
shital appaso palekar(SI (Sub-Inspector)) / wpsi **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही)

**Name** (नाव): shital appaso paleka
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): wpsi

**N.C.R.B (एन.सी.आर.ब**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**

**खबरी जबाब** **दिनांक २५/०५/२०२३**

मी, श्री.दिलावर गुलाब मुलाणी, वय ४५ वर्षे, व्यवसाय-ग्रामसेवक, ग्रामपंचायत मुसांडवाडी व मायणी रा.नवीन वसाहत, माळीनगर रोड, मायणी, ता.खटाव जि.सातारा मो.नं. ७८४०९९११३९

मी दि. २४/०५/२०२३ रोजी पोउपअधी वैद्य मॅडम, अॅन्टी करप्शन ब्युरो सातारा यांना फोन करुन माझ्याकडे करण्यात येणाऱ्या लाचेच्या मागणी बाबत तक्रार थोडक्यात सांगितली व त्यानुसार मी माझेकडे लाच मागणाऱ्या लोकसेवकांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली. तसेच मला पंचायत समिती, खटाव नोकरीसाठी जावे लागत असल्याने ऑफिस सोडून अॅन्टी करप्शन ब्युरोच्या कार्यालयात येण्यास जमणार नाही तर तुम्हीच वडूज येथे येवून माझ्या तक्रारी नुसार कारवाई करावी अशी विनंती मी वैद्य मॅडम यांना केली.

त्यानुसार दि.२५/०५/२०२३ रोजी सकाळी १०.४५ चे सुमारास मी वैद्य मॅडम यांचे सांगणे नुसार वडूज येथील स्वंयवर मंगल कार्यालयाचे बाजूस असलेल्या मोकळया जागेत थांबलो असताना वैद्य मॅडम व त्यांचे पथक त्या ठिकाणी आले. तेव्हा वैद्य मॅडम यांचे सांगणे नुसार मी गाडी मध्ये बसलो व वैद्य मॅडम यांनी गाडीतील पंचांची माझेशी व माझी पंचांशी ओळख करुन देवून पंचांना माझी तक्रार थोडक्यात सांगितली की, मी मुसांडवाडी व मायणी ग्रामपंचायत येथे ग्रामसेवक म्हणून कार्यरत असून संजय विलासराव सोनावले, विस्तार अधिकारी, पंचायत समिती, खटाव(वडूज) यांनी मला कार्यालयीन कामकाजामध्ये शुल्लक चुका काढून माझा मानसिक छळ करीत असत तसेच वरीष्ठांना कसूरी अहवाल पाठवेन, निलंबित करेन अशा धमक्या देत असत. मायणी ग्रामपंचायत निवडणूकीचे अनुषंगाने झाले प्रकाराबाबत मला गटविकास अधिकारी श्री.साळुंखे साहेब यांनी कारणे दाखवा नोटीस काढलेली आहे त्या कारणे दाखवा नोटीसीच्या अनुषंगाने माझ्यावर कोणतीही कारवाई न करण्यासाठी विस्तार अधिकारी, संजय सोनावले यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केली असून त्याबाबत लेखी तक्रार अर्ज मी वैद्य मॅडम यांना दिला. माझा तक्रारी अर्ज वैद्य मॅडम व पंचांनी वाचुन बघितला व त्यावर सहया घेतल्या. त्यानंतर पोउपअधी वैद्य मॅडम यांनी मला व पंचांना पडताळणी पंचनाम्याची कार्यवाही समजावुन सांगुन त्याबाबत आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोउपअधी वैद्य मॅडम यांचे सुचनेवरुन पो.कॉ.भोसले यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व सीलबंद मेमरी कार्ड मला व दोन्ही पंचांना दाखवून त्याबाबत संपूर्ण माहिती देवून त्यांचेकडील सीलबंद मेमरी कार्ड काढून व्हॉईस रेकॉर्डर मध्ये घातले. त्यानंतर पोउपअधी वैद्य मॅडम यांनी मला व पंच नं.१ यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देवून व्हॉईस रेकॉर्डरसह मला व पंच नं.१ यांना विस्तार अधिकारी, संजय सोनावले यांची भेट घेण्यासाठी पाठविले ती वेळ ११.१५ वाजताची होती. सदर वेळी सापळा पथकातील इतर सापळा पथक हे स्वंयवर मंगल कार्यालयाचे बाजूस असलेल्या मोकळया जागेत शासकीय वाहनात थांबून होते. मी पंचायत समिती खटाव(वडूज) येथे गेलो तेव्हा माझी भेट संजय सोनावले, विस्तार अधिकारी यांची भेट झाली. तेव्हा संजय सोनावले, विस्तार अधिकारी यांनी कारणे दाखवा नोटीसीच्या अनुषंगाने माझ्यावर कारवाई न करण्यासाठी माझ्याकडे १२,०००/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम लगेच स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर मी व पंच नं.१ असे माझ्या दुचाकी वाहनाने सापळा पथक थांबले ठिकाणी परत ११.३७ वा.सुमारास आलो. त्यावेळी पोउपअधी वैद्य मॅडम यांचे सुचनेवरुन पो.कॉ.भोसले यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केला. पोउपअधी वैद्य मॅडम यांनी मला व पंच नं.१ यांना झालेली हकीकत विचारुन तसेच रेकॉर्डर मधील संभाषण ऐकून विस्तार अधिकारी, संजय सोनावले यांनी माझ्याकडे १२,०००/- रु. लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम लागलीच स्विकारणार असल्याचे पोउपअधी वैद्य मॅडम व दोन्ही पंचांची खात्री झाली.

लोकसेवक सोनावले साहेब यांनी मला लागलीच लाचेची रक्कम आणुन देण्यास सांगितलेने वेळेच्या अभावी व जागेच्या अभावी पडताळणी दरम्यान माझ्यामध्ये व सोनावले साहेबांच्यामध्ये झालेल्या संभाषणाची स्क्रिप्ट नंतर करण्यात येईल असे वैद्य मॅडम यांनी सांगितलेने लागलीच सापळा पुर्व व सापळा कारवाईचे आयोजन करण्यात आले. सापळा पुर्व कारवाईच्या अनुषंगाने वैद्य मॅडम यांनी मला व पंचांना आवश्यक त्या सुचना देवुन सदरची सापळा कारवाई शासकीय वाहनातच पुर्ण करण्यात येणार असल्याबाबत सांगितले. त्यानंतर सोनावले साहेब हे माझ्याकडुन लाच स्विकारणार असल्याची खात्री झाल्यावर पोउपअधी वैद्य मॅडम यांनी सापळा कारवाईचे आयोजन करुन मला १२,०००/- रु.लाच रक्कम हजर करण्यास सांगितल्याने मी १२,०००/- रु इतकी लाचेची रक्कम पोउपअधी वैद्य मॅडम यांचेकडे हजर केली. वैद्य मॅडम यांचे सुचनेनुसार पो.ना.चव्हाण यांनी अॅन्थ्रासीन पावडर व अल्ट्रा व्हॉयलेट दिवा यांची मला व पंचांना माहिती देवून त्याचे प्रात्याक्षिक शासकीय वाहनामध्ये कृत्रिम अंधार करुन दाखविले. त्यानंतर पो.ना.चव्हाण यांनी

वैद्य मॅडम यांचे सुचनेनुसार १२,०००/- रु. लाचेच्या रक्कमेस अॅन्थ्रासीन पावडर लावली व ती लाचेची रक्कम माझ्या शर्टच्या डावे बाजूच्या खिशात ठेवून दिली व मला व पंच नं.१ यांना लाचेची रक्कम घेवून विस्तार अधिकारी, संजय सोनावले यांना देण्यासाठी १२.०४ वा. रवाना केले.

त्यानंतर मी व पंच नं.१ असे माझ्या दुचाकीवरुन पंचायत समिती, खटाव (वडूज) येथे गेलो. मी व पंच नं.१ असे पंचायत समिती कार्यालयाचे पाठीमागून पंचायत समिती मधील संजय सोनावले, विस्तार अधिकारी यांचे केबीनमध्ये गेलो. त्यावेळी मी आत जावून सोनावले साहेबांची भेट घेतली तेव्हा लोकसेवक सोनावले यांनी माझ्यासोबत इतर बोलणी करुन मी लोकसेवक यांना बर देवू का? असे विचारल्या नंतर लोकसेवक सोनावले यांनी मला किती आणले असे विचारले. त्यावर मी सोनावले साहेबांना १२,०००/- रु. आणले आहेत असे म्हणून मी माझ्या शर्टच्या डावे बाजूच्या खिशातून उजव्या हाताने लाचेची रक्कम काढून सोनावले साहेब यांचे समोर धरुन मोजून घ्या असे म्हणालो. तेव्हा सोनावले साहेबांनी लाच रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्विकारुन लाच रकमेच्या नोटा दोन्ही हाताने मोजून त्यांचे पॅन्टच्या पुढील उजवे बाजूच्या खिशात ठेवल्या. त्यानंतर विस्तार अधिकारी, संजय सोनावले यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर मी त्यांचे केबीनच्या बाहेर येवून माझा डावा हात दोन वेळा डोक्यावर फिरवून सापळा पथकाला दिसेल अशा रितीने पूर्वनियोजित इशारा केला.

सदर इशारा पाहून पोउपअधी वैद्य मॅडम यांचे सुचनेनुसार पो.कॉ.भोसले यांनी माझ्या जवळ येवून माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केला ती वेळ १२.१८ वा.ची होती त्यानंतर सापळा पथकाने विस्तार अधिकारी, संजय सोनावले यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पोउपअधी वैद्य मॅडम यांनी पंचायत समिती खटाव (वडूज) येथील गटविकास अधिकारी, उदयसिंह साळुंखे यांना सापळा कारवाईची माहिती दिली. त्यानंतर सापळा पथक पंचनाम्याचे पुढील कारवाई करण्याकरीता शासकीय विश्रामगृह, वडूज येथे आले व याच ठिकाणी सापळा पंचनाम्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.

तरी दि.२५/०५/२०२३ रोजी ११.१५ ते १२.१८ वा.चे दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कारवाईमध्ये लोकसेवक संजय विलासराव सोनावले, वय-५६ वर्षे, विस्तार अधिकारी, पंचायत समिती, खटाव (वडूज) रा.समर्थ सदन, केसरकर पेठ, सातारा, मुळ रा.खंडोबाची पाली, बस स्टॅण्ड जवळ, पाली ता.कराड जि.सातारा यांनी मला मायणी ग्रामपंचायत निवडणुकी मध्ये झाले प्रकाराबाबत गटविकास अधिकारी साळुंखे यांनी काढलेल्या कारणे दाखवा नोटीसीच्या अनुषंगाने माझ्यावर कोणतीही कारवाई न करण्यासाठी विस्तार अधिकारी, संजय विलासराव सोनावले यांनी माझ्याकडे १२,०००/- रु.लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम पंचायत समिती, खटाव (वडूज) कार्यालयातील विस्तार अधिकारी यांचे केबिनमध्ये स्विकारली म्हणून माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

हा खबरी जबाब दिला.

समक्ष

M. Pangre
ठाणे अंमलदार
वडूज पोलिस स्टेशन

श्री. दिलावर गुलाब मुलाणी.